**सं.फौ.प्र.क्र.१९४/२०१६** **निशाणी क्र.७४**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन</u>**

नाव – गोविंद गणपत मुठे वय – ३६ वर्षे,

व्यवसाय – चालक व शेती राहणार – शेंडी, ता.अकोले, जि.अहमदनगर.

प्र.१ तुम्हाला विचारण्यात येणा–या प्रश्नांची उत्तरे देण्यास तुम्ही बांधील नाही, जर प्रश्नाचे उत्तर चुकले तर त्यासाठी तुम्हाला कोणतीही शिक्षा होणार नाही, पण तुम्ही दिलेली उत्तरे ही विचारात घेतली जातील, हे समजले काय ?

उत्तर होय.

प्र.२ साक्षीदार क्र.१ फिर्यादी उत्तम पंडीत कोटकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी माल वाहतूक महिंद्रा मॅक्सिमो गाडी क्र.एम.एच.१७–ए.जी.८६७७ (मॉडेल २०१४) घेतली होती. ती गाडी त्यांचे नावावर होती व आहे. त्या गाडीवर चोलामंडलम फायनान्स कंपनी, शाखा–संगमनेर यांचे कर्ज होते. त्यांनी त्या कर्जाचे हप्ते भरले. मात्र घरगुती अडचणीमुळे ती गाडी त्यांनी विक्री करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दिनांक १४.११.२०१४ रोजी तुम्ही त्यांचेबरोबर विक्री करारनामा केला. तो करारनामा क्र.२५४६/२०१४ मा.नोटरी साहेब अकोले यांचेकडे नोंदविलेला आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याप्रमाणे त्या गाडीचा व्यवहार रु.३,१८,०००/– (रुपये तीन लाख अठरा हजार मात्र) ठरला व पैकी २,६३,०००/– (रुपये दोन लाख त्रेसष्ठ हजार) कर्ज

तुम्ही भरण्याचे ठरले. त्या गाडीचा फायनान्स कर्जाचा हप्ता रु.९४००/-(रुपये नऊ हजार चारशे मात्र) इतका होता व करारनामा करतेवेळी तुम्ही त्यांना रक्कम रु.५५,०००/- (रुपये पंचावन्न हजार मात्र) रोख दिलेली आहे व उर्वरित रक्कम कर्ज रुपाने भरण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे त्या गाडीचा ताबा त्यांनी तुम्हास दिनांक १४.११.२०१४ रोजी दिला. त्याप्रमाणे तुम्ही काही हप्ते भरले मात्र उर्वरित काही हप्ते भरले नाही म्हणून त्यांनी तुम्हास वेळोवेळी विचारणा केली. मात्र तुम्ही उडवाउडवीची उत्तरे दिली, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०२.०३.२०१६ रोजी त्यांनी तुम्हास गाडीचा व्यवहार पूर्ण करून देण्याची विनंती केली. मात्र तुम्ही त्यांना तुमच्या आर्थिक अडचणींचे कारण सांगून "जुलै-ऑगस्ट मध्ये माझे कर्जप्रकरण मंजूर होणार आहे. तेव्हा तुम्हास तुमची रक्कम मिळून जाईल," असे म्हणून तुम्ही त्यांना चेक देऊन "तुम्ही सदरची रक्कम घेऊन गाडीचे कर्ज भरून टाका व उर्वरित हिशोब मी तुम्हास नंतर देऊन टाकील," असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे तुम्ही त्यांना दिनांक ०१.०८.२०१६ रोजी तुमचे खाते असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा-शेंडी येथील खाते क्र.३१७८११९५८२ चा निशाणी ३२ वरील चेक क्र.००६८७१ रक्कम रु.२,००,०००/- (रुपये दोन लाख मात्र) चा दिला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे?

उत्तर खोटे आहे.

प्र.५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याप्रमाणे त्यांनी तुमच्यावर विश्वास ठेवून तो चेक सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा-

अकोले येथील त्यांचे खाते क्र.३३०००००६०५५८ या खात्यात दिनांक ०१.०८.२०१६ रोजी टाकला. त्याबाबतची निशाणी ३३ वरील पावती याकामी दाखल आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.६ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तो चेक दिनांक ०८.०८.२०१६ रोजी "Funds Insufficient" असा शेरा मारून न वटता परत आला. त्याबाबत सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा–अकोले यांनी निशाणी ३४ वर चेक रिटर्न मेमो दिला आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.७ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याबाबत त्यांनी तुम्हाला कल्पना दिली असता तुम्ही त्यांना अरेरावीची भाषा करून रक्कम देण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी तुमच्याकडे वारंवार रक्कमेची मागणी करूनही तुम्ही रक्कम रु.२,००,०००/– (रुपये दोन लाख मात्र) त्यांना दिली नाही, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.८ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी तुम्हाला वकिलामार्फत दिनांक १६.०८.२०१६ रोजी निशाणी ३५ वरील रजि.नोटीस पाठवून चेक न वटता परत आलेबाबत व चेकवरील रक्कम अदा करणेबाबत कळविले. ती नोटीस तुम्हाला दिनांक २२.०८.२०१६ रोजी मिळाल्याबाबत निशाणी ३६ वर रजि.पोस्टाची पोहोच पावती आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.९ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही नोटीस मिळून देखील त्यांची रक्कम दिली नाही अगर नोटीस उत्तरही दिले नाही. तुम्ही

त्यांची रक्कम देण्यास टाळाटाळ केली असून त्यांची फसवणूक केली आहे. अशा प्रकारे तुम्ही तुमच्या बँकेतील खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नाही व चेक वटला जाणार नाही, याची कल्पना व जाणीव असताना तसेच तुम्ही त्यांना कायदेशीर देणे लागत असताना देखील तुम्ही त्यांची फसवणूक व विश्वासघात करण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक त्यांना हा चेक दिला व तो चेक न वटता परत आल्याने तुम्ही त्यांची फसवणूक व विश्वासघात करून त्यांचे आर्थिक नुकसान केलेले आहे व निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१० साक्षीदार क्र.२ बाळासाहेब गंगाधर वैद्य यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते सन २००७ पासून नोटरी म्हणून काम पाहत आहे. दिनांक १४.११.२०१४ रोजी तुम्ही व गोविंद गणपत मुठे करारनामा नोंदविण्यासाठी त्यांच्याकडे आला होतात. तुम्ही दोघांनी त्यांचेसमक्ष करारनाम्यावर सह्या केल्या होत्या. तद्नंतर ओळखीच्या साक्षीदारांनी सह्या केल्या होत्या. तदनंतर त्यांनी तो करारनामा त्यांचे नोटरी रजिस्टरला नोंदवला व रजिस्टरवर लिहून देणार व लिहून घेणार यांच्या सह्या व निशाणी अंगठा घेतला. त्या करारनाम्याला २५४६/२०१४ असा त्यांचे रजिस्टरचा नोंदणी क्रमांक पडला. त्यांनी त्या करारनाम्याचा आशय त्यांचे रजिस्टरला नोंदवला आहे व तो करारनामा नोटराईज्ड करून दिला. दिनांक १४.११.२०१४ रोजी करारनामा नोंदविल्याबाबतची नोटरी रजिस्टरची सत्यप्रत त्यांनी निशाणी ४८ वर दाखल केली आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.११ साक्षीदार क्र.३ योगेश सुनिल कोटकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १४.११.२०१४ रोजी गाडी खरेदीविक्री व्यवहाराचे संदर्भाने ते अकोलेमध्ये आले होते. तो व्यवहार तुमच्यामध्ये व फिर्यादी उत्तम पंडीत कोटकर मध्ये झाला होता. तो व्यवहार हा मालवाहतूक चारचाकी गाडी क्र.एम.एच.१७-ए.जी.८६७७ हिचेबाबत झाला होता. तो व्यवहार हा रक्कम रु.३,१८,०००/- (रुपये तीन लाख अठरा हजार मात्र) मध्ये ठरला होता व त्यापैकी त्या दिवशी रोख रक्कम रु.५५,०००/- (रुपये पंचावन्न हजार मात्र) दिले होते व उर्वरित रक्कम हप्त्याने देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे निशाणी ५३ वरील नोटराईज्ड करारनामा करण्यात आला, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१२ साक्षीदार क्र.४ ऋषिकेश राजाराम आहेर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुम्ही त्यांच्या बँकेचे खातेदार आहात. तुमचे त्यांच्या बँकेमध्ये बचत खाते क्र.३१७८१११५८२ आहे. त्यांच्या बँकेने तुम्हाला त्यांचे दिनांक २९.०९.२०१५ रोजीच्या अर्जानुसार दिनांक ०५.१०.२०१५ रोजी २० पानी चेक क्र.००६८७१ ते ००६८९० चे चेक बुक दिले आहे. त्यांच्या बँकेने तुम्हाला चेक बुक दिल्याबाबतचे त्यांच्या बँकेकडे कॉम्प्युटर रेकॉर्डमधील संबंधित नोंदीच्या स्क्रीनशॉटची प्रत निशाणी ७०, अ.क्र.४ वर आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१३ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, निशाणी ७०, अ.क्र.१ वर तुमचे त्यांच्या बँकेत खाते असलेबाबत बँकेतील कॉम्प्युटर रेकॉर्डमधील प्रोफाईलची प्रत आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१४ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, निशाणी ७०, अ.क्र.२ वर तुमची त्यांच्या बँकेतील कॉम्प्युटर रेकॉर्डमध्ये असणा–या सहीच्या नमुन्याची प्रत आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१५ यापुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तुमचे बचत खाते क्र.३१७८१११५८२ चा दिनांक २८.०९.२०१५ ते दिनांक २४.०१.२०२६ रोजीपर्यंतचा संगणकीकृत खाते उतारा निशाणी ७२ वर दाखल आहे, याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

उत्तर खोटे आहे.

प्र.१६ तुम्हाला शपथेवर जबाब द्यायचा आहे काय ?

उत्तर नाही.

प्र.१७ तुम्हाला साक्षीदार तपासावयाचे आहेत काय ?

उत्तर नाही.

प्र.१८ तुम्हाला केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर माझ्याविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे.

आरोपी

समक्ष

1.4.2026

(डी.एम.हिंग्लजकर)
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

**दिनांक – ०१.०४.२०२६**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वर नमूद आरोपीचा जबाब माझे समक्ष त्याच्या सांगणेप्रमाणे खरा व बरोबर नोंदविणेत आला आहे.

समक्ष

1.4.2026

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

**दिनांक – ०१.०४.२०२६**